दूरध्वनी क्रमांक:-०२२- २३७६०८७२/ ०३९१
ईमेल:- dcest००१@gmail.com

महाराष्ट्र शासन,
कार्यालय- वस्तू व सेवाकर भवन,
विशेष राज्यकर आयुक्त यांचे कार्यालय,
माझगांव, मुंबई ४०० ०१०.

---

क्र : राज्य.निरी./म.लो.आ./सुधारीत निकाल-२०१६/आस्था-४/ब- 775 मुंबई, दिनांक- 6 OCT 2022

प्रति,
**श्री.जाधव सूरज दिलीप**
राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१६
शिफारस पात्र उमेदवार

**विषय :-** राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१६ सुधारीत निकालाच्या अनुषंगाने उमेदवारांच्या शिफारशीबाबत.
**संदर्भ :-** १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास पाठवलेले पत्र क्र.१४४२(२)(२)/२०१६/तेरा-अ/ दिनांक- ०८.११.२०१९.
२. मा. अवर सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.०५.०८.२०२२ रोजीचे पत्र.
३. मा. अवर सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांचे दि.निरंक रोजीचे पत्र.

संदर्भ क्र.३ वरील पत्रानव्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यकर निरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०१६ राज्यकर निरीक्षक संवर्गाच्या सुधारीत निकालाच्या अनुषंगाने श्री.जाधव सूरज दिलीप यांची राज्यकर निरीक्षक पदी शिफारस करण्यात आली आहे.

प्रत्यक्ष नियुक्तीपूर्वी या शिफारस प्राप्त ०१ उमेदवाराकडून खालील बाबींची (परिशिष्ट-अ व ब) पूर्तता करण्याबाबत विभागास कळविण्यात आलेले आहे. नव्याने शिफारस करण्यात आलेल्या खालील तक्त्यातील नमूद उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी पूर्ण करणे आवश्यक आहे.

**तक्ता क्र.१-**

| अ.क्र. | गुणवत्ता क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|---|
| १ | १७२ | जाधव सूरज दिलीप |

१. शिफारस पात्र उमेदवारांनी खालील नमूद तक्त्यातील वेळापत्रकाप्रमाणे प्रमाणपत्रे / कागदपत्रे **पडताळणीसाठी** वरील नमूद पत्त्यावर हजर राहावे.

तसेच सोबतच्या यादीतील (परिशिष्ट-ब) प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ तसेच सत्यापित प्रती (२ संच) साक्षांकन नमून्यासोबत (२ संच) दिलेल्या वेळेत या कार्यालयात सादर करावयात.

तक्ता क्र.२-

| अ.क्र. | म.लो.आ. गुणवत्ता क्र. | प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्याचा दिनांक | निर्धारीत वेळ |
|---|---|---|---|
| १. | १७२ (एकूण-१) | **१०.१०.२०२२** | गुणवत्ता क्र.१७२<br>**सकाळी ०९.४५ a.m ते संध्याकाळी ६.१५ p.m** |

२. शिफारस यादीतील ०१ उमेदवाराला नवीन सांक्षाकन नमुना आयोगाच्या www.mpsc.gov.in या बेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर सांक्षाकन नमुना डाऊनलोड करुन घेण्याबाबत तसेच तो भरुन (३ प्रतींमध्ये) या कार्यालयामध्ये सादर करण्याच्या सूचना उमेदवारांना देण्यात येत आहेत. सदर उमेदवाराने त्यांचे पूर्णपणे भरलेले साक्षांकन नमुने **(३ प्रतींमध्ये)** कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेवेळी **दि.१०.१०.२०२२ रोजी** कार्यालयात सादर करावेत.

३. तसेच असेही स्पष्टपणे कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती प्रमाणपत्रे / कागदपत्रे विहीत मुदतीत या कार्यालयात सादर न केल्यास आपणास राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्ती स्विकारण्यास स्वारस्य नाही, असे समजून आपला राज्यकर निरीक्षक पदावरील नियुक्तीचा हक्क रद्द समजण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

४. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाआधारे उमेदवारांच्या शिफारशी त्यांनी प्रस्तुत परीक्षेच्या अर्जात नमूद केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधिन राहून शासनाकडे केल्या आहेत. सदर तपासणीत उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता न केल्यास, अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासताना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेच्या निकालातून शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या शिफारशी समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात आलेल्या आहेत.

६. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या सूचना सोबत परिशिष्ट-अ मध्ये जोडण्यात आल्या आहेत.

७. सोबतच्या परिशिष्ट-ब मधील यादीप्रमाणे प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तसेच २ सत्यापित प्रतीचे संच साक्षांकन नमुन्यासोबत वरील कालावधित (कार्यालयीन वेळेत) या कार्यालयात सादर करावेत.

सदरचे पत्र व **परिशिष्ट-अ व ब** या पत्रासोबत राज्यकर विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर **"Whats New"** या सदराखाली उपलब्ध करुन देण्यात आले आहे. उमेदवारांनी पुढील संपर्कासाठी आपला ई-मेल आय.डी, दूरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक साक्षांकन नमुन्यासोबत (Attestation Form) या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र- परिशिष्ट-अ व ब**

**(महेश पाटील)**
**राज्यकर उपआयुक्त (आस्थापना) ४,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

<u>**परिशिष्ट-अ**</u>

१. प्रस्तुत पदासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविले आहेत. त्यामुळे उमेदवारांची प्रमाणपत्रे आयोगाकडे उपलब्ध झालेली नाहीत. तसेच, उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी आयोगाकडून करण्यात आलेली नाही. आयोगाने प्रस्तूत परीक्षेचा निकाल उमेदवारांच्या अर्जातील दाव्यानुसार त्यांची पात्रता विचारात घेऊन जाहीर केला आहे. त्यामुळे उमेदवारांच्या माहितीसाठी शिफारस यादीतील आवश्यक त्या टिपा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करताना सदर टिपा विचारात घेवून नियुक्ती करण्यात यावी अशा आयोगाच्या सुचना आहेत.

२. **वयोमर्यादा :-** दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ रोजी

**अ)** अमागास - किमान १८ वर्ष असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०२.१९७९ to ०१.०२.१९९९)

**ब)** अमागास खेळाडू - किमान १८ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०२.१९७४ to ०१.०२.१९९९)

**क)** मागासवर्गीय - किमान १८ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०२.१९७४ to ०१.०२.१९९९)

**ड)** मागासवर्गीय खेळाडू - किमान १८ वर्ष असावे व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.
Age reference date (०२.०२.१९७४ to ०१.०२.१९९९)

**इ)** दिव्यांग - कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम.
Age reference date (०२.०२.१९७२ to ०१.०२.१९९९)

३. **दिव्यांग** - दिव्यांगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

४. **अनाथ व माजी सैनिक** - आरक्षण विहित केले नाही.

५. **शैक्षणिक अर्हता** - साविंधिक विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता मुख्य परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पुर्वी म्हणजे दिनांक १३ मे, २०१७ किंवा तत्पुर्वी धारण करणे अत्यावश्यक आहे.

६. **अंतर्वासिता (Internship)** - निर्धारीत केली असेल अशी पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांनी अंतर्वासिता (Internship) मुख्य परीक्षेचे अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजे दिनांक १३ मे, २०१७ किंवा तत्पूर्वी पुर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात यावे.

७. **उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र** - प्रस्तूत परीक्षेची जाहिरात दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१६ रोजी विज्ञापित केलेली आहे. त्यामुळे उनत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (NCL) प्रमाणपत्र जाहिरात विज्ञापित झालेल्या वित्तीय वर्षाचे लगतपूर्वीच्या (एप्रिल ते मार्च) वित्तीय वर्षातील म्हणजे दिनांक १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च, २०१६ या वित्तीय वर्षातील किंवा तदनंतरचे असणे आवश्यक आहे.

८. **मराठीचे ज्ञान** - प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेमधील **परिच्छेद-६.४.४** नुसार मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. सदर बाब संबंधित उमेदवारांच्या मराठी भाषेच्या ज्ञानाबाबत त्यांच्या शालान्त/ उच्च माध्यमिक परीक्षेच्या प्रमाणपत्राआधारे खात्री करुन घेण्यात यावी.

९. शिफारस करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांचे दावे आयुक्त, आदिवासी विकास व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्याकडून तपासून घेण्यात यावेत. तसेच अन्य सर्व मागासवर्गीय उमेदवारांचे जाती /जमातीचे दावे नियुक्तीपूर्वी संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडून तपासून घेण्यात यावेत.

१०. अमागास महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांची तसेच अन्य वर्गवारीतील महिलांसाठी आरक्षित पदावर शिफारस करण्यात आलेल्या महिला उमेदवारांची उपरोक्त परिच्छेद ३(६) मध्ये नमूद केलेल्या कालावधीतील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे विहित नमुन्यातील अद्ययावत प्रमाणपत्रे शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दि. २५ मे, २००१ मधील "(दोन) प्रमाणपत्रे" या शीर्षाखालील तरतूदींनुसार विहित केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून त्यांच्या नेमणूकीपूर्वी तपासून घेण्यात यावीत अशी आयोगाची सूचना आहे.

११. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागासवर्ग या वर्गवारीवर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेली उपरोक्त **परिच्छेद ३(६)** मध्ये नमुद केलेल्या कालावधीतील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतची विहित नमुन्यातील अद्ययावत **(NCL)** प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी संबंधित प्राधिकाऱ्यांकडून तपासून घेवून त्यांच्या नियुक्तीबाबत निर्णय घेण्यात यावा, अशी आयोगाची सूचना आहे.

१२. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे **विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन** यांनी तपासण्याच्या अधीन राहून त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे. यास्तव सदर उमेदवरांची क्रिडा विषयक प्रमाणपत्रे शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १८ऑगस्ट. २०१६ आणि तद्नंतर (दि.११ मार्च, २०१९ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकातील तरतुदी) वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार अद्ययावत शासन निर्णयामधील तरतुदीनुसार त्यांच्या नियुक्तीपूर्वी **संबंधित विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य** यांच्याकडून तपासून घेण्यात यावीत. सदर उमेदवारांचा क्रीडा विषयक खेळाचा कालावधी हा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा म्हणजे दिनांक १३ मे, २०१७ किंवा तत्पूर्वीचा असावा. शासनाच्या दिनांक ०१ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार संबंधित विभागीय उपसंचालक यांचे क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू प्रस्तुत पदाच्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच सदर

उमेदवारांना नियुक्ती देण्यात यावी. संबंधित आरक्षणाचा लाभ घेण्यास अपात्र ठरत असतील तर असे उमेदवार प्रस्तुत पदावर नियुक्तीस पात्र ठरणार नाही.

१३. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकीय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधिन राहून त्यांची शिफारस करण्यात येत आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अपंग १००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील बाब क्र.(६) नुसार त्यांच्या नेमणूकीपूर्वी सदर उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची देखील वैद्यकीय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, **शासन निर्णय क्र. अप्रकि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि.१४ सप्टेंबर २०१८** मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavalambancard.gov.in या संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेल्या नवीन नमुन्यातील किमान ४०% कायमस्वरुपी दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र शासन नेमणुकीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील. तसेच शासन निर्णय, क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी, अशी आयोगाची सूचना आहे.

१४. प्रस्तुत परीक्षेचा सुधारीत अंतिम निकाल मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ८४८१/२०१८, तसेच रिट याचिका क्रमांक ८८७६/२०१८ तसेच इतर न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने/ अधिन राहून जाहीर करण्यात आला आहे. ही बाब शिफारसपत्रान्वये उमेदवारांच्या विशेषत्वाने निदर्शनास आणण्यात आली आहे.

१५. प्रस्तुत पदाच्या मुख्य परीक्षेचा सुधारीत अंतिम निकाल दिनांक ०७ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोगाकडून घोषित करण्यात आला होता व त्यानुसार आयोगाच्या दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ रोजीच्या पत्रान्वये ०५ उमेदवारांच्या शिफारसी करण्यात आल्या होत्या. परंतु शासनाच्या दि.निरंक च्या पत्रान्वये सुधारीत निकालामुळे शिफारसपात्र ठरलेल्या ०१ उमेदवाराची आवेदनपत्रे प्रती उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

१६. शिफारस यादीतील सर्व उमेदवारांना आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेला साक्षांकन नमुना डाउनलोड करून घेण्याबाबत तसेच तो भरून **अपर मुख्य सचिव(वित्त), महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, विक्रीकर (प्रशासन-२), मंत्रालय** यांचेकडे न पाठवता परस्पर नियुक्ती देण्यात आलेल्या शासनाच्या संबंधित विभागास/ कार्यालयास तात्काळ सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

१७. संबंधित उमेदवारांचा अर्जातील फोटो व प्रत्यक्षात रूजू झालेला उमेदवार तोच आहे का, तसेच त्यांनी मुख्य परिक्षेच्या आवेदनपत्रात उल्लेख केलेल्या आधार क्रमांकावरुन आधारकार्डवरील उमेदवाराचा फोटो व स्वाक्षरी, ओळखपत्रावरील फोटो व स्वाक्षरी त्याच उमेदवाराची आहे का, सादर केलेले ओळखपत्र अधिकृत आहे का, याची नियुक्तीपूर्वी शासनस्तरावरून सखोल तपासणी करण्यात यावी. **तसेच उमेदवारांनी परीक्षेच्या वेळी सादर केलेल्या ओळखपत्राची वैधता संबंधित सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात यावी. तद्नंतरच विषयांकित पदावरील उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यात याव्यात, अशी शासनास विशेषत्वाने सूचना करण्यात येत आहे.**

१८. शिफारसप्राप्त ठरलेल्या उमेदवारास विषयांकित पदावर नियुक्ती दिल्यानंतर त्यांच्या नियुक्ती आदेशांच्या प्रती आयोगास कृपया माहितीकरीता पाठविण्यात याव्यात.

महेश पाटील
राज्यकर उपआयुक्त, (आस्था-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## परिशिष्ट-ब

**खालील प्रमाणपत्रे (मूळ व सत्यापित २ प्रतीत) सादर करावीत.**

१. इयत्ता १० वी ची गुणपत्रिका व प्रमाणपत्र.

२. इयत्ता १२ वी ची गुणपत्रिका व प्रमाणपत्र.

३. पदवी परिक्षेची गुणपत्रिका व प्रमाणपत्र (दिनांक १३ मे, २०१७ किंवा तत्पूर्वीचे)

४. जन्मतारखेचा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला किंवा एस.एस.सी. उत्तीर्ण प्रमाणपत्र)

५. जातीचा दाखला व वैधता प्रमाणपत्र (लागू असल्यास)

६. विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र. (Domicile)

७. उनत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र. (लागू असल्यास)

८. MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

९. शारिरिक दृष्ट्या दिव्यांग असल्याबाबतचा दाखला (लागू असल्यास)

१०. दोन जबाबदार व्यक्तींकडून आपल्या चारित्र्याचे दाखले.

११. क्रिडाविषयक प्रमाणपत्र (दिनांक १३ मे, २०१७ किंवा तत्पुर्वीचे) व तपासणी अहवाल (खेळाडू प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवाराच्या बाबतीत)

१२. महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांचा विवाह झाल्यावर नावात बदल झाला असल्याचा दाखला (विवाह प्रबंधक किंवा राजपत्रित अधिकारी यांचेकडून)

१३. मुख्य परीक्षेचे प्रवेशपत्र.

१४. आधारकार्ड व मुख्य परीक्षेच्या वेळी सादर केलेले ओळखपत्र

१५. साक्षांकन नमुना.

१६. परीक्षा अर्जामध्ये अपलोड केलेले मूळ छायाचित्र (फोटो) सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

१७. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

महेश पाटील
राज्यकर उपआयुक्त, (आस्था-४)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.